| | |
|---|---|
| MHYA190001132021 | दाखल दिनांक - ०४.०२.२०२१<br>नोंदणी दिनांक - ०४.०२.२०२१<br>निकाल दिनांक - ०२.०४.२०२६<br>कालावधी - ०५ वर्षे, ०१ म. २९ दि. |

**२ रे प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, राळेगाव यांचे न्यायालयात.**

**(पिठासीन अधिकारी श्री. रामचंद्र दत्तात्रय माने)**

**सं.फौ.ख.क्र.५४/२०२१** **नि. क्र.४२**

**फॉर्म – अ**

| | |
|---|---|
| तक्रारदार / फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे वडकी,<br>ता. राळेगाव, जि.यवतमाळ. |
| प्रतिनिधीत्व | शासनातर्फे विद्ववान विधीज्ञ श्री एस. आर. उदापुरकर |
| आरोपी | **प्रविन बाबाराव कुमरे ,**<br>वयः ३५ वर्षे, व्यवसायः मजुरी<br>रा.परसोडा ता. राळेगाव जि. यवतमाळ. |
| प्रतिनिधीत्व | आरोपींतर्फे विद्ववान विधीज्ञ श्री.रवि नागोबा माहुरकर |

**फॉर्म – ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख वेळ व स्थळ | दि.१९.१२.२०२० रोजी १७.३० वाजताच्या दरम्यान मौजे खडकी गावाकडून परसोडाकडे येत असताना ता. राळेगाव जि. यवतमाळ. |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १९.१२.२०२० |
| दोषारोप / प्रतिकथन निश्चीत केल्याचा दिनांक | ०८.११.२०२१ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | ०८.११.२०२१ |

| | |
|---|---|
| ज्या दिवशी निकाल राखुन ठेवला तो दिनांक | निरंक. |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२.०४.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर. | निरंक. |

**फॉर्म – क**

| आरोपी अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीन दिल्याचा दिनांक | गुन्हा | निर्दोष / दोषी | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं.च्या कलम ४२८ च्या उद्देशाने अटकेत ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **प्रविण बाबाराव कुमरे** | फौ.प्र. संहिता कलम ४१(अ) प्रमाणे नोटीस दिली. | – | महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ अ व ई प्रमाणे | निर्दोष | – | – |

**फॉर्म – ड**

## फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/साक्षीदारांची यादी.

## (अ) फिर्यादी साक्षीदारांची यादी.

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सरकारी सा.क्र.१ | रवि नागोबा माहुरकर | जप्ती पंच |

## (ब) बचाव पक्ष साक्षीदारांची यादी.

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|

| निरंक |
|---|

**(क) न्यायालय साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/निशाणी क्रमांक यादी.**

**(अ) फिर्यादी नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| सरकारी सा.क्र.१ | नि.क्र.४० | जप्ती पंच |
| सरकारी सा.क्र.१ | नि.क्र.४१ | जप्तीपंचनाम्यावरील अनु क्रमांक १ वरील सहीस |

**(ब) बचाव पक्ष नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**(क) न्यायालय नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | वर्णन | नि.क्र. |
|---|---|---|
| १ | प्रतिकथन व आरोपीची जबानी | (नि.क्र.१०) |

**(ड) मुद्देमाल वस्तु.**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**न्यायनिर्णय**

(दि.०२.०४.२०२६ रोजी घोषीत)

महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे वडकी, ता. राळेगाव, जि.यवतमाळ यांनी आरोपीविरुध्द अपराध क्र. २५३/२०२० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीविरूदध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ अ व ई च्या संपरिक्षेनुसार खटला

चालविण्यात आला आहे.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन की, फिर्यादी दिनांक १९.१२.२०२० रोजी पोलीस कॉन्स्टेबल २०६७ यांचे सह वडकी शहर व परिसरात दारूबंदी कामी पेट्रोलिंग करीत असताना त्यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम खडकी गावाकडून परसोडा कडे पायदळ चालून त्याचे कब्जात एका नायलॉन थैलीमध्ये अवैधरीत्या दारू बाळगून दारू विक्री करणे करता घेऊन जात आहे त्यामुळे फिर्यादी पोलीस स्टाफ सह व पंचनाम्यात नमूद पंचासह खडकी येथील सरकारी दवाखान्याजवळ सापळा रचून थांबले असता खडकी कडून एक इसम त्याचे कब्जात पांढरे रंगाची थैली घेऊन येत असताना दिसून आले. फिर्यादीने सदर इसमास थांबवून त्यास पंचासमक्ष त्यांची व पंचांची ओळख देऊन त्यांचे नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्याचे नाव प्रवीण बाबाराव कुमरे राहणार परसोडा पोस्ट चहांद तालुका राळेगाव असेच सांगितले. फिर्यादीने सदर इसमाच्या ताब्यातील पंचायत समक्ष थैलीची पाहणी केली असता त्यामध्ये गोवा संत्रा कंपनीचे देशी दारूचे १८० मिली क्षमतेचे दहा काचेच्या शिशा ज्याची किंमत ५२० रुपये मुद्देमाल मिळून आला. फिर्यादीने मुददेमाल पैकी रासायनिक परीक्षण अहवालाकामी रितसर एक नमुना वेगळा काढला. फिर्यादीने आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम अ व ई प्रमाणे फिर्याद दाखल केली. तक्रारीच्या अनुशंगाने आरोपी विरूध्द पुरेसा पुरावा मिळुन आल्याने सदर आरोपी विरूध्द दोषारोप न्यायालयात दाखल झाले.

३. अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विधीज्ञ यांचा

युक्तिवाद ऐकला. त्यावरून सदर खटल्याचे निर्णयासाठी पुढील वादप्रश्न उद्भवले असून त्याखाली दिलेल्या कारणमिमांसेवरून काढलेले निष्कर्ष त्यासमोर नोंदविण्यात आलेले आहेत.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की दि. १९.१२.२०२० रोजी मौजे खडकी गावाकडून परसोडाकडे येत असताना ता. राळेगाव जि. यवतमाळ आरोपीच्या ताब्यातून देशी दारू गोवा संत्रा नंबर १ कंपनीच्या १८० मिली क्षमतेचे १० पव्वे/नग मिळून आले.? | नाही. |
| २ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे... |

## कारणमिमांसा

**४.** प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने एक साक्षीदार तपासले असुन, सरकारी साक्षीदार क्रं.१ नामे, मधुकर विठ्ठल आत्राम (जप्तीपंच) यांची साक्ष (नि.क्र.१४) वर नोंदविण्यात आली, सदर प्रकरणात बचाव पक्षातर्फे एकही साक्षीदार तपासण्यात आलेला नाही.

### मुददा क्रं १ करीता :–

**५.** सदर मुद्याच्या अनुषंगाने अभिलेखावरील सदर साक्षीदाराचा पुरावा पाहणे आवश्यक आहे. सरकारी साक्षीदार क्रं.१ नामे, रवि नागोबा माहुरकर (जप्तीपंच) यांची साक्ष (नि.क्र.४०) वर नोंदविण्यात आली, सदर साक्षीदाराने त्यांच्या सरतापासात

कथन केले की, साक्षीदार आरोपीला ओळखत नाही. पोलिसांनी साक्षीदाराला कोठेही जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलावले नव्हते. पोलिसांनी त्यांच्या समक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. सदर साक्षीदाराने सरकारी पक्षास सहाय्य केले नाही त्यामुळे सरकारी वकिलांनी साक्षीदाराचा उलट तपास घेतला त्यामध्ये साक्षीदाराने नाकारले की साक्षीदाराला दिनांक १९.१२.२०२० रोजी पोलिसांनी मौजे ग्राम खडकी सरकारी दवाखान्याजवळ रोडवर तालुका राळेगाव जिल्हा यवतमाळ येथे जगदीप पंचनामा करिता बोलावले होते. साक्षीदार पुढे नाकारतात की, साक्षीदार पोलीस स्टाफ सह जप्ती पंचनामा करण्याकरता घटनास्थळी गेले असता तेथे एक इसम हातामध्ये नायलॉन थेली घेऊन खडकी गावाकडून परसोडा गावाकडे पायदळ येताना मिळून आला त्यांनी त्याचे नाव प्रवीण बाबाराव ठोंबरे असे सांगितले. सदर साक्षीदाराने त्यांच्या उलट तपासात नाकारले की, त्यावेळी पोलिसांनी त्यांच्या समक्ष सदर घटनास्थळी आरोपीचे अंगझडती केली असता आरोपीच्या ताब्यातील नायलॉन थैलीमध्ये देशी दारू गोवा संत्रा कंपनीच्या १८० मिली क्षमतेच्या १० सीलबंद दारू ५२० रुपयाचा मुद्देमाल मिळाला. साक्षीदार पुढे नाकारतात की, त्यावेळी त्यांच्या समक्ष रासायनिक परीक्षण अहवाला कामी मुद्देमाल पैकी एक 180 मिल्क क्षमतेचा रीतसर नमुना वेगळा काढून सीलबंद केला. साक्षीदार पुढे नाकारतात की, पोलिसांनी त्यांच्या समक्ष जप्ती पंचनामा करून साक्षीदाराला वाचून दाखवण्यात आला त्यानंतर त्यांनी त्यावर सही केली. सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये आरोपीविरुद्ध कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

६. सदर प्रकरणातील अभिलेखाचे, कागदपत्राचे, साक्षीदाराच्या पुराव्याचे

अवलोकन केले असता व आरोपीविरूध्दचे आरोप पाहता, सरकार पक्षाने सदर प्रकरणात स्वतंत्र साक्षीदारामार्फत आरोपीच्या ताब्यातुन दारूबंदीकामी मुददेमाल जप्त केला ही बाब अभिलेखावर आणणे गरजेचे आहे. या प्रकरणात सरकारी साक्षीदार क्रं.१ नामे, रवि नागोबा माहुरकर (जप्तीपंच) यांची साक्ष (नि.क्र.४०) वर नोंदविण्यात आली, सदर साक्षीदाराने सरकारी पक्षास सहाय्य केले नाही. आरोपीच्या ताब्यातुन सदर प्रकरणातील मुददेमाल जप्त केला ही बाब स्वतंत्र साक्षीदारा मार्फत अभिलेखावर आलेली नाही. अश्या परिस्थीतीत आरोपीने सदरचा गुन्हा केला हे पुराव्या अभावी सिध्द होत नाही. त्यामुळे थोडक्यात सरकार पक्षाने जप्ती पंचनामा सिध्द केलेला नाही. त्यामुळे जप्त केलेली देशी दारू गोवा संत्रा नंबर १ कंपनीचे १८० मिली क्षमतेचे १० पव्वे/नग दारू आरोपीच्या ताब्यातून जप्त केली हे सिध्द होवू शकले नाही त्यामुळे रासायनिक परिक्षण अहवालावर विसंबुन राहता येणार नाही. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. उपरोक्त चर्चेवरुन सरकार पक्षास आरोपीविरुध्दचे आरोप संशयाच्या पलिकडे सिध्द करण्यास अपयश आल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुददा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी नामे, **प्रविन बाबाराव कुमरे ,**रा.परसोडा ता. राळेगाव जि. यवतमाळ यास महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ अ व ई च्या आरोपातून फौजदारी प्रक्रीया संहीता १९७३ कलम २५५(१) अंतर्गत निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा जामीन व बंधपत्र रदद करण्यात येतो.

३. आरोपीला आदेशीत करण्यात येते की, त्याने फौजदारी प्रक्रीया संहीता १९७३ कलम ४३७ अ प्रमाणे रक्कम रू. १५,०००/– ( पंधरा हजार रूपये ) चा जामीन व बंधपत्र दयावे.

४. सदर खटल्यातील जप्त मुद्देमाल देशी दारू गोवा संत्रा नंबर १ कंपनीच्या १८० मिली क्षमतेचे १० नग/पव्वे अपिलाची मुदत संपल्यावर राज्य उत्पादन शुल्क विभाग, यांच्याकडे कायदेशीररित्या विल्हेवाट लावण्यासाठी पाठविण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत करण्यात आला.)

RAMCHANDRA DATTATRAYA MANE

Digitally signed by RAMCHANDRA DATTATRAYA MANE
Date: 2026.04.02 12:14:06 +0530

**दि.०२.०४.२०२६** **(श्री.रामचंद्र दत्तात्रय माने )**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट क्र.२ राळेगाव जि. यवतमाळ.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे बरोबर आहेत.

लिपीकाचे नाव – श्री. जी. व्ही. चव्हाण

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग–१, राळेगाव.

| | |
|---|---|
| आदेश दिनांक | : ०२.०४.२०२६ |
| पिठासीन अधिका–यानी स्वाक्षरी केलेली तारीख | : ०२.०४.२०२६ |
| आदेश/ न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख | : ०५.०३.२०२६ |